पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: १०/०७/२०२०**

# किष्टापूर नाल्यावरील पुलास पोलीस अधीक्षकांची भेट

## ➢ वचनपुर्तीमुळे गावकऱ्यांकडुन पोलीस अधीक्षकांचा सन्मान

अहेरी तालुका मुख्यालयापासुन ६० किमी अंतरावर असलेल्या जिमलगट्टा पोलीस उपविभागात मौजा देचलीपेठा कडे जाणाऱ्या मार्गावर किष्टापुर नाला आहे. या नाल्याला अनेक वर्षांपासुन पुल नसल्यामुळे या परिसरातील २२ गावांचा पावसाळयात जगाशी संपर्क तुटून नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असे. या भागातील नागरिकांना अहेरी व जिमलगट्टा येथे विविध कामाकरीता नेहमीच ये-जा करावी लागते. पावसाळयाच्या दिवसात या पुलाच्या अभावामुळे जनजीवन विस्कळीत होवुन आठवडी बाजार, शिक्षण, आरोग्य सुविधा, शेतमजुरीच्या तसेच शासकिय कामांकरीता फार मोठया अडचणींचा नागरिकांना सामना करावा लागत असे. या पुलाच्या अभावामुळे काही नागरिकांना आजारपणात तसेच गर्भवती महिलांना प्रसुतीच्या काळात स्वत:चा जीवही गमवावा लागलेला आहे. नागरिकांची मागणी पाहता गडचिरोली पोलीस दल व जिल्हा प्रशासन यांनी किष्टापुर नाल्यावरील पुलाच्या मंजुरी करीता पुढाकार घेवुन शासनाकडे पाठपुरावा केला यामुळे शासनाकडुन सदर पुलाच्या बांधकामास मंजुरी मिळाली.

या पुलावरील नाल्याला नक्षलवादयांनी विरोध दर्शवत दिनांक ८ एप्रिल, २०२० रोजी मौजा किष्टापूर नाला पुलाच्या बांधकामावरील वाहनांची जाळपोळ केली होती. यानंतर मौजा किष्टापूर पंचक्रोशीतील अनेक ग्रामपंचायतींनी नक्षलवाद्यांना जाहीर विरोध करत नक्षलवाद्यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळत निषेध नोंदविला होता. नक्षलवाद्यांनी कोणत्याही बाबीचा विचार न करता केवळ स्वत:च्या फायद्यासाठी येथील पुलाचे बांधकाम हाणुन पाडण्यासाठी वाहनांची जाळपोळ केली, असल्याचे सांगत गडचिरोली जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच किष्टापूर पंचक्रोशीतील २२ गावांनी ग्रामसभेत नक्षलवाद्यांना तिव्र विरोध दर्शवित **नक्षल गावबंदीचा ठराव मंजुर केला होता**. या पुलाच्या बांधकामासाठी प्रशासनाला ग्रामस्थ स्वत: पुढाकार घेवुन मदत करतील अशी ग्वाहीही ठरावात देण्यात आली होती. यावेळी नक्षलवाद्यांनी जनतेच्या विकासाच्या आड येवु नये अशा शब्दांत ग्रामस्थांनी नक्षलवाद्यांना इशारा दिला होता. गावकऱ्यांचा पुढाकार पाहुन नक्षलवादयांच्या विरोधाला न जुमानता २२ गावांत नक्षल गावबंदी ठराव संमत करणाऱ्या ग्रामस्थांचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी स्वागत करुन, नक्षलवाद्यांनी कितीही आडकाठी निर्माण केली, तरी गडचिरोली पोलीस दल सदैव मौजा किष्टापुर पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या पाठीशी राहील व पुलाचे बांधकाम पावसाळ्यापुर्वी पुर्ण करु, त्याचबरोबर पुलाचे काम पुर्णत्वास गेल्यानंतर या पुलास व गावकऱ्यांची भेट घेण्यासाठी आवर्जुन उपस्थित राहील असे आश्वासन ग्रामस्थांना दिले होते.

पुलाचे काम पुर्णत्वास गेल्यानंतर आज मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे यांनी नागरिकांना दिलेल्या वचनाची वचनपुर्ती करण्यासाठी मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राहुल गायकवाड व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यासह सदर पुलास भेट दिली. यावेळी किष्टापुर पंचक्रोशीतील नागरीकांनी एकत्र येत सदर पुल पुर्णत्वास येण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानत मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांचा शाल श्रीफळ देत सन्मान केला. मा. पोलीस अधीक्षक श्री. शेलेश बलकवडे सा़ो. यांनी पोलीस विभागाच्या वतीने गावकऱ्यांनी केलेला हा सन्मान स्विकारत सदर पुलाच्या पुर्णत्वाचे श्रेय पुलाच्या कामासाठी अहोरात्र झटणाऱ्या पंचक्रोशीतील नागरिक व सदर भागात पुलाच्या बांधकामासाठी गस्त घालणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा उल्लेख करत त्यांना दिले. त्याचबरोबर पोलीस

अधीक्षकांनी सन-१९९३ मध्ये नक्षलवाद्यांनी सदर ठिकाणी केलेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेले १ अधिकारी व ४ कर्मचारी यांचे स्मरण करत सदर पुल हा **शहीद सेतु** म्हणुन ओळखला जाईल असे म्हटले.

इतिहासात पहिल्यांदाच नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशिल व अतिदुर्गम भागातील नागरिक नक्षलवाद्यांच्या विरोधाला न जुमानता नक्षलवादाविरोधात एकवटले, या नागरिकांनी पुलाच्या बांधकामासाठी सुमारे दोन ते अडीच महिने रोज रात्री वेगवेगळ्या गावांतील ५० लोकांनी पुलाच्या बांधकामासाठी खडा पहारा दिला. गडचिरोली पोलीस दलावर विश्वास ठेवत नक्षलवाद्यांच्या विरोधाला केराची टोपली दाखवत पुलाच्या पुर्णत्वासाठी घराबाहेर पडत स्वत:ला झोकुन देणाऱ्या नागरिकांना गडचिरोली पोलीस दलाच्या बहादुर जवानांची साथ लाभली आणि अवघ्या दोन महिण्यात पुलाचे बांधकाम पुर्णत्वास गेले. याद्वारे आदिवासी बांधव व गडचिरोली पोलीस दल यांच्यात नविन विश्वासाचा सेतू बांधला गेला आहे. या पुलाचा फायदा पंचक्रोशीतील अनेक ग्रामपंचायती व असंख्य नागरिकांना मिळणार आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या "प्रोजेक्ट प्रगती" अंतर्गत मौजा दोडगिर येथील ६३ नागरीकांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यापैकी ०५ नागरिकांना प्रतिकात्मक स्वरुपात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच मौजा तुमरगुडा, मौजा शेडा, मौजा पेरकाभट्टी, मौजा दोडगिर, मौजा किष्टापुर, मौजा पत्तीगाव, मौजा लाखनगुडा येथील ग्रामपंचायतींनी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राहुल गायकवाड जिमलगट्टा यांचेकडे मनोरंजनाचे साधन म्हणुन टिव्ही संचाची मागणी केली होती त्याप्रमाणे आज मा. पोलीस अधीक्षकांच्या हस्ते टिव्ही व डीशचे वाटप करण्यात आले.

किष्टापूर पंचक्रोशीतील नागरिकांचा जिल्ह्यांतील इतर नागरिकांनी आदर्श घेवुन नक्षलवाद्यांचा ठामपणे विरोध करत विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी एकत्र यावे. गडचिरोली पोलीस दल जिल्ह्यातील नागरिकांना सर्वतोपरी मदत व संरक्षण देण्यास कटीबध्द आहे. असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी जिल्हाभरातील नागरिकांना केले आहे.





